# मराठी विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचा अहवाल

" भाषांतरामुळे आपल्याला अवगत नसलेल्या भाषांतील साहित्य आपण वाचू शकतो".असे प्रतिपादन यां सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.राजेश पांडे यांनी केले.आबड लोढा जैन महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या '**तौलनिक साहित्य आणि भाषांतर : संशोधनाच्या नव्या दिशा**' या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राप्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.दिल्ली येथील विश्वविद्यालयाचे माजी मराठी विभागप्रमुख निशिकांत मिरजकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्रस्तुत चर्चासत्र आयोजित केले होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेच्या विश्वस्थ मंडळाचे माननीय सचिव श्री.जवाहरलालजी आबड यांनी भूषविले. सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे श्री.विजय सोनवणे ,सौ.पांडे श्री.राजेश आढाव,डॉ.राजेंद्र मलोसे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रास्ताविक डॉ.तुषार चांदवडकर यांनी तर महविद्यायाच्या प्रगतीचा आहवाल प्रा.डॉ.जी.एच.जैन यांनी आपल्या मनोगतातून सादर केला.आपल्या उद्घाटनपर मनोगतात श्री.राजेश पांडे म्हणाले की," भाषांतरामुळे आपल्याला अवगत नसलेल्या भाषांतील साहित्य आपण वाचू शकतो.इंग्रजी,हिंदी,मराठी या भाषांमध्ये भारतीय भाषांमधले व जागतिक भाषांमधले साहित्य भाषांतरीत झाले तर ते आपल्या आस्वादाच्या कक्षेत येते.'' यानंतर राज्य मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ.दिलीप धोंडगे आपल्या मनोगतात म्हणाले की," तौलनिक साहित्यभ्यास हा साहित्याचाच अभ्यास आहे,पण तो अभ्यास करीत असतांना अन्य विद्याशाखांची मदत घ्यावी लागते. या अभ्यासकाला किमान एका भाषेची चांगली जाण असली पाहिजे,ती भाषा बोलणाऱ्या समाजाची मात्र विस्तृत व सखोल जाण असली पाहिजे.'' यानंतर राज्य मराठी संस्थेचे संचालक डॉ.आनंद काटीकर आपल्या मनोगतात म्हणाले की," भारतीय भाषांचे अभ्यासक निर्माण होणे ही काळाची गरज आहे.भारतीय बोलींचे शास्त्रशुद्ध संशोधन होत नाही.मराठीच्या बोलींच्या अभ्यासासाठी राज्य मराठी विकास संस्था कार्य करीत आहे.'' यावेळी काटीकरांनी राज्य मराठी विकास संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.

यानंतर आपल्या बीजभाषणात ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके म्हणाले की, "तौलनिक साहित्याच्या अभ्यासकाला साहित्याच्या ज्ञानाबरोबरच तत्वज्ञान,इतिहास,मानसशास्त्र,समाजशास्त्र,मानवशास्त्र या ज्ञानशाखांकडूही साहित्याच्या अभ्यासासाठी साहाय्य घेता येते.''यानंतर ज्येष्ठ समीक्षक निशिकांत मिरजकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.चांदवड शिंपी समाज बांधवांच्या वतीने मुकेश कोकणे यांनी मानाचा फेटा मिरजकर सरांना बांधला.तसेच चांदवड येथील शिंपी समाज बांधवांच्या वतीने चांदवड तालुका प्रमुख नितीन कोकणे,योगेश जगताप,साळवे सर,डॉ.संजय कोकणे तसेच मंगळूर येथील शीख बांधवांच्या वतीने देखील संत नामदेव महाराजांच्या विषयी विपुल लेखन केल्याबद्दल डॉ.मिरजकरांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.आपल्या सत्काराला उत्तर देतांनाडॉ.मिरजकर म्हणाले की, "या सत्काराने मी भारावून गेलो आहे.तौलनिक साहित्य हा माझा आवडीचा आणि अभ्यासाचा विषय या विषयात चांगल्या प्रकारे चांगले लेखन करता आले या विषयाला न्याय देता आला याचा आनंद आहे.''अध्यक्षीय मनोगत जवाहरलालजी आबड यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ.दत्ता शिंपी यांनी केले.

उद्घाटनपर मनोगतानंतर पहिले सत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ.सतीश बडवे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.शिरीष लांडगे-पाटील यांनी 'मध्ययुगीन मराठी साहित्य आणि तौलनिक अभ्यास' या विषयावर शोधनिबंध वाचन केले.पुणे येथील डॉ.वंदना बोकील-कुलकर्णी यांनी 'तौलनिक साहित्याभ्यास आणि विद्यापीठे' या विषयावर शोधनिबंध सादर केला.यावेळी चर्चक म्हणून प्रा.विजय केसकर यांनी चर्चासत्रातील चर्चेला पुढे नेले.तसेच 'हिन्दी व मराठी दलित साहित्यः एक तौलनिक अभ्यास' या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला.दुसऱ्या दिवशी दुसरे सत्र अनुवाद (भाषांतर )या विषयावर रंगले.यात अमरावती येथील शासकीय महाविद्यालयाचे पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. केशव तुपे यांनी 'मराठीतील अनुवाद विचार' तर कवी गणेश विसपुते यांनी 'नाटकाची भाषांतरे:एक तौलनिक विचार' तसेच खर्डी (जि.ठाणे) येथील प्राचार्य डॉ.कैलास कळकटे

यांनी 'कथात्मक साहित्याचे भाषांतर' या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला.या दोन्ही सत्रांचे सूत्रसंचालन प्रा.गणेश आहेर व प्रा. योगेश आहिरे यांनी केले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातून विविध अभ्यासक आले होते. या चर्चासत्रासाठी ग्रंथपाल प्रा.संतोष ठाकरे,प्रा.ए.ए.वकील,प्रा.सुभाष सोनवणे,डॉ.सी.के.कुदनर व कार्यालय विभागाचे शिवदास ईशी आणि सुनील चीतनर यांनी तसेच अनिल आहिरे, अमीर शेख या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.




चांदवड येथील आबड,लोढा सुराणा व जैन महाविद्यालयातील मराठी विभाग आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तौलनिक साहित्य आणि भाषांतर : संशोधनाच्या नव्या दिशा या विषयावर आयोजित मराठी विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करतांना श्री. राजेश पांडे तसेच व्यासपीठावर श्री. जवाहरलाल आबड,वसंत आबाजी डहाके, ,डॉ निशिकांत मिरजकर, सौ.ललिता मिरजकर,डॉ.दिलीप धोंडगे,डॉ.जी.एच.जैन,आनंद काटीकर,सतीश बडवे,शिरीष लांडगे-पाटील,विजय सोनवणे,डॉ.राजेंद्र मलोसे,डॉ.तुषार चांदवडकर .






SNJB
SHRI. NEMINATH JAIN BRAMHACHARYASHRAM SANCHALIT
LATE SAU KANTABAI BHAVARLALJI JAIN
COLLEGE OF ENGINEERING
NEMINAGAR, CHANDWAD DIST.NASHIK


SNJB
SHRI. NEMINATH JAIN BRAMHACHARYASHRAM SANCHALIT
LATE SAU KANTABAI BHAVARLALJI JAIN
COLLEGE OF ENGINEERING
NEMINAGAR, CHANDWAD DIST.NASHIK